**महाराष्ट्र शासन**

**प्रवेश नियामक प्राधिकरण आणि राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष**

३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी,

अली यावर जंग मार्ग, वांद्रे, मुंबई ४०० ०५१

दुरध्वनी : ०२२ - २६४७ ६०३४ वेबसाईट : www.mahacet.org

फॅक्स : ०२२ - २६४७ ६०३४ ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

---

**<u>तातडीचे/कालमर्यादा</u>**

क्र.राज्यसीईटीकक्ष/पीजीडी-सीईटी-२०१६/डॉहेस्मृदंमहिंगोगली/९८७ /२०१६, दिनांक -२७/०५/२०१६

प्रति,
प्राचार्य,
डॉ.हेगडेवार स्मृती रुग्ण सेवा मंडळ,
दंत महाविद्यालय व रुग्णालय, हिंगोली.

**विषय - <u>पीजीडी-सीईटी-२०१६</u>**
**डॉ.हेगडेवार स्मृती रुग्णसेवा मंडळ दंत महाविद्यालय व रुग्णालय, हिंगोली यांना प्राप्त झालेल्या नवीन मान्यता पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रिया राबविण्यास परवानगी देणेबाबत.**

**संदर्भ - आपले पत्र क्र. एचडीसीएच/पीजी-सीईटी/२०१६/४९४, दिनांक २५/०५/२०१६.**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत दिनांक १९ मे, २०१६ आणि २० मे, २०१६ या कालावधीत दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमांची अंतिम प्रवेश फेरी ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, भायखळा, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर अंतिम प्रवेश फेरीनंतर खाजगी दंत महाविद्यालयांमध्ये रिक्त राहीलेल्या जागा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या दिनांक २३ मे, २०१६ च्या पत्रान्वये संस्थास्तरावर भरण्यास परवानगी दिलेली आहे.

आपल्या संदर्भाधीन पत्रान्वये खालील तक्त्यात नमूद दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नव्याने मान्यता प्राप्त झाली असल्याचे कळविले आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १. | प्रोस्थोडोन्टीक्स ॲन्ड क्राऊन ॲन्ड ब्रीज | ०३ |
| २. | पेरीओडोन्टॉलॉजी | ०३ |
| ३. | कन्झरवेटीव्ह डेन्टीस्ट्री ॲन्ड इन्डोडोन्टीक्स | ०२ |

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात आलेली प्रवेश प्रक्रिया संतुष्टात आलेली असल्याने उक्त अभ्यासक्रमांचे प्रवेश या कार्यालयामार्फत केंद्रीभुत पध्दतीने करणे शक्य नाही.

प्रस्तुत प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, उक्त तक्त्यात नमूद केलेल्या दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश पीजीडी-सीईटी-२०१६ ची गुणवत्ता यादी वापरुन गुणवत्तेनुसार भारतीय दंत परिषदेमार्फत जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार अंतिम दिनांक ३१ मे, २०१६ पर्यंत संस्थास्तरावर करण्यास परवानगी देण्यात येत आहे. सदरची दिनांक ३१ मे, २०१६ रोजी पुर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा. सदरची प्रवेश प्रक्रिया अत्यंत पारदर्शकतेने आणि गुणवत्तेनुसार पार पाडावी.

**(चंद्रशेखर व.ओक)** भाप्रसे
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत -

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

२. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक यांना माहितीकरिता अग्रेषित.